# मेट्रो 3 : विद्युतीकरणासाठी करार



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या भुयारासह डेपोचे विद्युतीकरण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल बुधवारी टाकण्यात आले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन व अ‍ॅलस्टोम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड व अ‍ॅलस्टोम ट्रान्सपोर्ट एस. ए. समूह यांच्या अधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ ३३.५ किमी संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाच्या विद्युतीकरणाच्या कामाचे कंत्राट एमएमआरसीने २१ फेब्रुवारी २०१८ रोजी अ‍ॅलस्टोम समूहाला दिले आहे. या कामात ३३.५ किमी संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाच्या भुयारासह डेपोचे विद्युतीकरण २५ केव्ही व ३३ केव्ही विद्युत वाहिन्या उभारण्याचे काम तसेच २७ स्थानकांवर ऑक्झलॅरी उपकेंद्र स्थापन करण्याच्या विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश आहे.

करारामध्ये उपरी विद्युत यंत्रणा व ऑक्झलॅरी उपकेंद्रच्या संरेखन डिझाईन, स्थापना व कार्यान्वयनाच्या कामाचा समावेश आहे. या कंत्राटावर एमएमआरसीच्या वतीने संचालक ए. ए. भट्ट, तर अ‍ॅलस्टोम समूहाच्या वतीने श्रीराम राजू व ब्रुनो इझामबर्ट यांनी स्वाक्षऱ्या केल्या. मेट्रो ३ साठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत अशी विद्युतीकरण व संकर्षण यंत्रणा राबवण्यासाठी तसेच हे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले आहे.